मुंबई । पुणे । कोल्हापूर । नाशिक । छत्रपती संभाजीनगर । सोलापूर । नागपूर । सातारा । जळगाव । नांदेड । अकोला । सांगली । अहमदनगर येथून प्रसिद्ध
SakalNews @SakalMediaNews www.esakal.com



## धैर्यशील भाजपमध्ये

पेणचे माजी आमदार धैर्यशील पाटील यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांच्या उपस्थितीत मंगळवारी भाजपमध्ये प्रवेश केला.

वृत्त : ५

# सकाळ

## वानखेडेवर पुतळा

सचिन तेंडुलकरच्या ५०व्या वाढदिवसानिमित्त एमसीएने वानखेडे स्टेडियम येथे त्याचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याचा निर्णय घेतला आहे.

वृत्त : ९

मुंबई, बुधवार, १ मार्च २०२३
किंमत ₹ ५ ● आजचा अंक

वेध

नितीन पाटील

# मनोरुग्णांचे ‘श्रद्धा’स्थान!

**माणसांवरील नितांत श्रद्धेतून सेवेचा मार्ग स्वीकारलेल्या डॉ. भरत वाटवानी आणि डॉ. स्मिता वाटवानी या डॉक्टर दाम्पत्याने मनोरुग्णांची नुसती सेवाच केली नाही, तर देशभरातील हजारो मनोरुग्णांना सन्मानाने जीवन जगण्याचा मार्ग मिळवून दिला आहे. हजारो मनोरुग्णांच्या वेदनांवर मायेची फुंकर घालून त्यांच्या आयुष्यात आनंद पेरण्याचे काम श्रद्धा फाऊंडेशनच्या माध्यमातून करीत असून, कर्जत येथील हे केंद्र मनोरुग्णांचे ‘श्रद्धा’स्थानच बनले आहे.**

डॉ. मोटवानी यांचा जन्म कोलकात्यातील. घरची प्रचंड गरिबी, त्यातच लहानपणी वडिलांचे छत्र हरपले. पोटाची खळगी भरण्यासाठी त्यांनी मुंबईची वाट धरली. कसेबसे काम करून ते शिकले आणि मानसोपचारतज्ज्ञ म्हणून डॉक्टरी मिळवली. पुढे त्यांचे लग्नही मानसोपचारतज्ज्ञ असलेल्या स्मिता यांच्याबरोबर झाले. आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने त्यांनी चार दशकांपूर्वी बोरिवलीत एका भाड्याच्या जागेत क्लिनिक सुरू केले, परंतु त्यांचा पिंड केवळ दवाखाना चालवून अर्थार्जन करण्यापुरताच मर्यादित नव्हता.

१९८८ मधील गोष्ट. एक दिवस दुपारच्या वेळी दवाखान्यातील काम संपवून डॉ. भरत आणि डॉ. स्मिता जेवणासाठी बोरिवलीतीलच शेजारच्या एका हॉटेलमध्ये गेले. अचानक त्यांचे लक्ष रस्त्याच्या कडेने वाहणाऱ्या गटाराकडे गेले. तेथे एक मनोरुग्ण तरुण नारळाच्या करवंटीने गटारातील पाणी पीत असल्याचे त्यांनी पाहिले. तोच प्रसंग ‘श्रद्धा फाऊंडेशन’ला जन्म देणारा ठरला. गटारातील पाणी पिणाऱ्या मनोरुग्णाला पाहून दोघेही प्रचंड अस्वस्थ झाले. ते त्याच्याजवळ गेले. त्याच्या डोक्यावर मायेचा हात ठेवून त्याला दवाखान्यात नेले. स्वच्छ केले, नवीन कपडे दिले, पोटभर खायला दिले आणि त्याच्यावर इलाज सुरू केला. पुढील काही दिवसांतच तो मनोरुग्ण त्या अवस्थेतून बऱ्यापैकी बाहेर आला. डॉक्टरांच्या लक्षात आले, की तो उत्तम इंग्रजी बोलतोय. चौकशी करताना डॉक्टरांना कळले, की तो उच्च विद्याविभूषित बी.एस्सी., डी.एम.एल.टी. पदवीप्राप्त कुशाग्र बुद्धिमत्तेचा होता. फक्त डोक्यावर परिणाम झाल्याने तो मजल दरमजल करत आंध्र प्रदेशातून मुंबईत पोहोचला होता. त्याचे वडीलही आंध्र प्रदेशमध्ये शासकीय सेवेत अधिकारी होते. डॉक्टरांनी त्याच्याकडून पत्ता घेत आंध्र प्रदेशमधील त्याच्या आई-वडिलांशी संपर्क साधला. ते त्वरित विमानाने मुंबईत आले. त्या माऊलीने आपल्या मुलाला मिठीत घेतल्यानंतर तिच्या चेहऱ्यावरील आनंद आणि व्यक्त केलेली श्रद्धापूर्वक सेवेसाठीची कृतज्ञता डॉक्टर दाम्पत्याला हत्तीचे बळ देऊन गेली.




कर्जत येथील श्रद्धा फाऊंडेशनचे मनोरुग्ण उपचार व पुनर्वसन केंद्र.

पुढे डॉक्टरांनी त्यांच्या क्लिनिकमधील दोन बेड खास मनोरुग्णांसाठीच राखीव ठेवले. एक दिवस जे. जे. स्कूल ऑफ आर्टच्या विद्यार्थ्यांची डॉक्टरांशी भेट झाली. तेव्हा त्यांनी डॉक्टरांना सांगितले, की त्यांचे एक प्रोफेसर मनोरुग्ण होऊन रस्त्यावर भटकत आहेत. डॉक्टरांनी त्वरित त्यांचा शोध घेतला. त्यांना आपल्या दवाखान्यात आणले. उपचार सुरू झाला. आपल्या गुरूंना भेटण्यासाठी अनेक विद्यार्थी डॉक्टरांच्या क्लिनिकमध्ये येत होते. प्रोफेसर पूर्ण बरे झाले. पुन्हा ते सेवेत रुजू झाले. तोपर्यंत डॉक्टरांच्या सेवा कार्याचा विस्तार होत होता. जागा कमी पडत होती, पण प्रश्न पैशांचा होता! म्हणून डॉक्टर वाटवानी करीत असलेल्या कार्यास हातभार लावण्यासाठी त्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी ‘श्रद्धा फाऊंडेशन’च्या मदतीसाठी जहांगीर आर्ट गॅलरीत चित्रांचे प्रदर्शन भरवले. तिथून मिळालेल्या मदतीतून डॉक्टरांनी १९९७ मध्ये दहिसर कांदरपाडा येथे एका जुन्या इमारतीत वीस बेडचे ‘मनोरुग्ण उपचार व पुनर्वसन केंद्र’ सुरू केले. व्रत सेवेचे असले तरी मार्ग खडतरच होता. तेथील लोकांनी डॉक्टरांनी सुरू केलेल्या या केंद्राला प्रखर विरोध करण्यास सुरुवात केली. पत्रकबाजी सुरू झाली, मोर्चे निघाले, आंदोलने झाली, अखेर प्रकरण न्यायालयात गेले. न्यायालयाने समर्पित भावनेने करीत असलेल्या सेवेच्या बाजूने निकाल दिला.

रस्त्यावर, रेल्वे- बस स्थानक, मैदाने, बाजारपेठा अशा अनेक ठिकाणी फिरणाऱ्या, बसलेल्या, झोपलेल्या मनोरुग्णाला विश्वास देऊन त्यांना आपल्या पुनर्वसन क़ेंद्रात आणले जाते. त्यांच्यावर उपचार करून बरे झालेल्या रुग्णांना त्यांच्या घरापर्यंत पोहोचवण्याचे काम या डॉक्टर दाम्पत्याचे सहकारी करीत आहेत.

एकदा डॉ. भरत आणि डॉ. स्मिता वर्धा येथे मनोरुग्णांना सोडण्यास गेले असताना त्यांनी बाबा आमटे यांची भेट घेतली. बाबांकडून समाजसेवेची प्रेरणा घेऊन पुनर्वसन केंद्रासाठी मोठी जागा शोधण्यास त्यांनी सुरुवात केली. अखेर रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील वेनगाव येथे त्यांनी साडेसहा एकर प्रशस्त जागेत ‘श्रद्धा फाऊंडेशन’चे मनोरुग्ण उपचार व पुनर्वसन केंद्र सुरू केले. २००६ मध्ये डॉ. प्रकाश आमटे यांच्या हस्ते त्या पुनर्वसन केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.

कर्जत येथील मनोरुग्ण उपचार व पुनर्वसन केंद्र केवळ मुंबई व लगतच्या जिल्ह्यात आढळणाऱ्या मनोरुग्णांसाठी सन्मानाने जीवन जगण्याचा मार्ग दाखवणारा दीपस्तंभच नाही, तर माणूसपण हरवलेल्यांना माणसात आणणारा आधारवड ठरले आहे. आज कर्जत येथील केंद्रात डॉक्टर, नर्स, सोशल वर्कर आणि इतर मदतनीस असे मिळून सुमारे ५० जण मनोरुग्णांच्या सेवेत कार्यरत आहेत. तेथे आजही १२० रुग्ण उपचार घेत आहेत. २००६ पासून आजवर तब्बल ९५०० मनोरुग्णांना पूर्णतः बरे करून त्यांना त्यांच्या मायेच्या माणसांकडे पोहोचवण्याचे फार मोठे काम डॉ. वाटवानी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले आहे. देशभरातील अगदी कन्याकुमारीपासून काश्मीरपर्यंत जवळजवळ सर्वच राज्यांमध्ये ‘श्रद्धा फाऊंडेशन’चे अविरत कार्य सुरू आहे. या देवदूताची ख्याती केवळ आपल्या देशातच नव्हे, तर सातासमुद्रापलीकडे पोहोचली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या ‘मॅगसेसे पुरस्कारा’ने २०१८ मध्ये डॉ. भरत वाटवानी यांना गौरवण्यात आले आहे. बोरिवलीत सुरू झालेला हा सेवेचा यज्ञ संपूर्ण देशभर फिरत मनोरुग्णांच्या सेवेत कार्यरत आहे. २०१९ मध्ये एका वर्षात १११४; तर लॉकडाऊनचा काळ वगळता २०२२ मध्ये केवळ एका वर्षात १०३० मनोरुग्णांना पूर्णतः बरे करून सुखरूप त्यांच्या घरी पोहोचवले यातच श्रद्धा फाऊंडेशनच्या कार्याची महती दडलेली आहे. वुई-टुगेदर फाऊंडेशनची धान्य बँक श्रद्धा फाऊंडेशनला धान्य पुरवून त्यांच्या कार्यात खारीचा वाटा उचलत आहे. त्याचबरोबर काही सामाजिक संस्था/ व्यक्तीदेखील या संस्थेच्या कार्याला हातभार लावत आहेत.

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)**
**np.nitin100@gmail.com**